सत्यमेव जयते

सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,

जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

| तक्रार क्रमांक-१३६/२०२३/जळगांव<br>व्दितीय अपील क्र.- १५१/२०१९/जळगांव,<br>व्दितीय अपील क्र.- १५२/२०१९/जळगांव | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | |
| १. | श्री.दिपक अरुण देवरे,रा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,मनोहर टॉकीजमागे, धुळे, ता.जि.धुळे. | तक्रारदार |
| | विरूद्ध | |
| १. | कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,अमळनेर,ता.अमळनेर, जि.जळगांव. | उत्तरवादी क्र.१ |
| २. | तालुका कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,अमळनेर,ता.अमळनेर, जि.जळगांव. | उत्तरवादी क्र.२ |

(निर्णय दिनांक ०२/०७/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक १३/०२/२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.आयोगाने व्दितीय अपील क्र.- १५१/२०१९/जळगांव,व्दितीय अपील क्र.- १५२/२०१९/जळगांव संदर्भात दिनांक१६/०९/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक ०७/१२/२०२२ अन्वये आदेश पारीत केलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,अमळनेर,ता.अमळनेर, जि.जळगांव यांनी कोणतीही कार्यवाही केली नसून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतुद आहे.

प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध अभिलेखावरुन आयोगास असे निदर्शनास येते की,आयोगाने व्दितीय अपील क्रमांक १५१/२०१९/जळगांव,व्दितीय अपील क्र.- १५२/२०१९/जळगांव संदर्भात दिनांक१६/०९/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक ०७/१२/२०२२ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,अमळनेर,ता.अमळनेर, जि.जळगांव यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्रमांक १५१/२०१९/जळगांव,व्दितीय अपील क्र.-१५२/२०१९/जळगांव संदर्भात दिनांक१६/०९/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक ०७/१२/२०२२ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. विभागीय कृषी सहसंचालक,विभागीय कृषी कार्यालय,नाशिक, ता.जि.नाशिक यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. **१३६/२०२३/जळगांव** अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

---

तक्रार क्रमांक-**१३६/२०२३/जळगांव** /जावक क्र. ८५९४ दिनांक- ०६/०७/२०२४

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) विभागीय कृषी सहसंचालक, विभागीय कृषी कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक

२) निवडनस्ती.